*Annexure IX (41), (Vide Article - 9.02 (iii))*

जप्त केलेल्या वन्यप्राण्यांचे कातडे / वन्यप्राण्यापासून
बनविण्यात आलेल्या वस्तू यांच्या साठयाची विल्हेवाट.

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक पीअेसी. १०९४/प्र.क्र.३०५/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८ जुलै १९९५

**वाचा.** १) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे पत्र क्र. २२(डी) (१) /प्र.क्र.१७८/५५०३, दिनांक २९ मार्च १९९५.
२) अतिरिक्त महानिरिक्षक (वन्यजीव) पर्यावरण व वन मंत्रालय, दिल्ली यांचे पत्र क्र.१-६०/८९-.डब्ल्युएलपी दिनांक ४ नोव्हेंबर, १९९४.

**शासन निर्णय :-**

वन विभागाकडे विविध वन्यप्राण्याचे कातडे / वन्यप्राण्यापासून बनविलेल्या वस्तू तसेच ट्रॉफीजचा जप्त केलेला साठा विविध ठिकाणी पडून आहे. या साठयाची विल्हेवाट लावणेबाबत उपाययोजना राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विचाराधीन होती. केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ४ नोव्हेंबर, १९९४ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, याबाबत सर्वागीण विचार करुन असे ठरविण्यात आले आहे की, जप्त केलेल्या वन्यप्राण्याच्या कातडयाची / वन्यप्राण्यापासून बनविलेल्या वस्तू तसेच ट्रॉफीज यांची विल्हेवाट खालीलप्रमाणे लावण्यात यावी.

ज्या प्रकरणामध्ये न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित नाहीत अशी प्रकरणे सोडून इतर सर्व प्रकरणात जप्त केलेला साठा जाळून नष्ट करण्यात यावा. असे करण्याआधी काही चांगले नमूने वन संवर्धनाबाबत शिक्षणासाठी व जागरुकता निर्माण करण्यासाठी शासकिय संस्था, सार्वजनिक संग्रहालय तसेच मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांना देण्यास राखून ठेवण्यात यावेत. ज्या प्रकरणी न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असतील त्याबाबत कार्यवाही न्यायालयाच्या आदेशानंतरच करण्यात यावी. साठा नष्ट करण्यापूर्वी वन्यजीव (संरक्षण) अधीनियम १९७२ च्या तरतूदीची अंमलबजावणी करावी.

केंद्र शासनाच्या आदेशानूसार राज्यातही कार्यवाही व्हावी अशी शिफारस मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी केली होती. हे लक्षात घेवून केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या पध्दती नूसारच जप्त

वन्यप्राण्याचे कातडे / त्यापासून बनविण्यात आलेल्या वस्तू तसेच ट्रॉफीज यांची विल्हेवाट लावण्यात यावी असे ठरविण्यात आले आहे.

जप्त वन्यप्राण्याचे कातडे / वन्यप्राण्यापासून बनविण्यात आलेल्या वस्तु, ट्रॉफिज इत्यादींची विल्हेवाट जाळून करण्यात येणार असेल अशा वेळेस आवश्यक ती स्थानिक पूर्वप्रसिध्दी देण्याची दक्षता घ्यावी. तसेच, संबंधित उपवनसंरक्षक हयाच्या समक्ष रितसर पंचनामा करुन साठयाची विल्हेवाट लावण्यात यावी. विल्हेवाट लावत असतांना वन विभागाच्या अधिका-याव्यतिरिक्त किमान दोन जबाबदार / स्थानिक महत्व असलेल्या व्यक्ती हजर राहतील हयाची दक्षता घेण्यात यावी. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतूदीची अंमलबजावणी होईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र. क्र. ३८३/९५/व्यय-१०दि.२८/६/१९९५ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी

(नि. ह. काकोडकर)

विशेष कार्य अधिकारी, महसुल व वन विभाग.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर,
सर्व मुख्य वनसंरक्षक,
सर्व वनसंरक्षक
सर्व उपवनसंरक्षक,
सर्व उप विभागीय वन अधिकारी (स्वतंत्र कार्यभार)
महालेखापाल-१ व २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
महालेखापाल-१ व २ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
आयुक्त, पोलीस महासंचालनालय, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
वन विभागामधील सर्व सहसचिव/उपसचिव,
वन विभागामधील सर्व कार्यासने,
फ-१ कार्यासने, महसुल व वनविभाग, (निवडनस्ती)

*Annexure IX (42), (Vide Article - 9.02 (iii))*

जप्त केलेल्या वन्यप्राण्यांचे कातडे /
वन्यप्राण्यापासून बनविण्यात आलेल्या
वस्तू यांच्या साठयाची विल्हेवाट.

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक पीअेसी. १०९४/प्र.क्र.३०५/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ५ ऑगस्ट, १९९५

**वाचा:-** शासन निर्णय समक्रमांक दिनांक १८ जुलै १९९५.

शुध्दीपत्रक:-

जप्त केलेल्या वन्यप्राण्याचे कातडे / वन्य प्राण्यांपासून बनविण्यात आलेल्या वस्तू यांच्या साठयाचा विल्हेवाट लावण्याबाबत उपरोक्त शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयातील दुस-या परिच्छेदातील

" ज्या प्रकरणामध्ये न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित नाहीत अशी प्रकरणे सोडून इतर सर्व प्रकरणांत जप्त केलेला साठा जाळून नष्ट करण्यात यावा"

**याऐवजी**

" ज्या प्रकरणामध्ये न्यायालयात प्रकरणे प्रलंबित नाहीत अशा प्रकरणात जप्त केलेला साठा जाळून नष्ट करण्यात यावा." असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्वाक्षरी**
**(नि. ह. काकोडकर)**
**विशेष कार्य अधिकारी,**
**महसुल व वन विभाग.**

**प्रति,**

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर,
**सर्व मुख्य वनसंरक्षक,**
**सर्व वनसंरक्षक**
**सर्व उपवनसंरक्षक,**
**सर्व उप विभागीय वन अधिकारी (स्वतंत्र कार्यभार)**
महालेखापाल-१ व २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
महालेखापाल-१ व २ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
आयुक्त, पोलीस महासंचालनालय, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२
**गुह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२**
**वन विभागामधील सर्व सहसचिव/उपसचिव,**
**वन विभागामधील सर्व कार्यासने,**
फ-१ कार्यासन, महसुल व वनविभाग, (निवडनस्ती)